हिंदुस्थान

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

७७ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

ॐ नमोजी आद्या...
गजानना, एकदंता, वक्रतुंडा,चतुर्हस्ता |
प्रथमेशा तुज नमो नमः ॥१॥
देवा तू स्वसंवेद्य |
सर्वेश हा असे आद्य |
वेदांचे हे प्रतिपाद्य | अनिर्वाच्य ॥२॥
कृपा करी विघ्नेशा | ओंकाररूपा समर्था |
गणेशा, भगवंता | उद्धरी बा ॥३॥
बाप्पा मोरया रे

■ वर्ष ७७ वे/अंक ३१ वा ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ अमरावती,मंगळवार दिनांक १५ सप्टेंबर २०२६ ■ ■ भारतीय सौर २४ भाद्रपद १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.००

couch puffy®
Architectural Choice Furniture!
100 HOMES 100 BEDROOMS
Only for first 100 families
MEGA SALE
Bedroom Sets Starting ₹ 49,900
100 + Bedrooms on Display
Imported
MRP -1,69,900/-
₹ 1,29,000/-
THE BIG MONSOON SALE
FLAT 50% OFF
BUY 1 GET 1 FREE On Home Decor
For Limited Time
T&C Apply
B5, ड्रिम्झलँड, रहाटगांव रोड, अमरावती | 99300-94691 / 8585-9552-85
BAJAJ FINSERV
काउच पफ़ी

फडणवीस यांच्या 'वर्षा'वर बाप्पा आले

मुंबई दि. १४ : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी गणेश चतुर्थीनिमित्त भक्तिमय वातावरणात श्री गणरायाचे आगमन झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यावेळीही सजावट खूपच सुंदर आणि आकर्षक केलेली आहे.

दरम्यान, बाप्पाच्या आगमनाच्या या मंगलमयी प्रसंगी फडणवीस कुटुंबियांच्या पारंपरिक लूकनेही सर्वांचे लक्ष वेधले. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सोशल मीडियावरुन हे फोटो पोस्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि त्यांची मुलगी दिविजा यांचे पूजेदरम्यानचे खास फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर पसंत केले जात आहेत. गणेश चतुर्थीच्या या पूजेचे आणि कौटुंबिक क्षणांचे फोटो व्हायरल झाले असून नेटकऱ्यांकडून त्यांना भरभरून पसंती मिळत आहे. दरवर्षाप्रमाणे यंदाही फडणवीस कुटुंबीयांनी पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात बाप्पाची स्थापना व पूजा-अर्चा केली. दरम्यान, वर्षा बंगल्यावरील बाप्पाचे लोभस रूप पाहून नेटकरी हरवून गेले आहेत.

दिशा सालियन प्रकरणाला नवे वळण

आदित्य ठाकरेंसह उद्धव ठाकरे, अनिल देशमुखांच्या नावाचा उल्लेख; सीबीआयकडून नवा एफआयआर दाखल

मुंबई दि. १४ : सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणाला आता पुन्हा एक नवं वळण लागलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात नव्याने आदेश दिल्यानंतर सीबीआयने एफआयआर दाखल केला आहे. त्यामध्ये आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासह अनेकांनी नावे असल्याचं उघड झालं आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांच्या जबाबानुसार नवा एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड इथे एका इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून दिशा सालियनचा मृत्यू झाला होता. दिशाच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच १४ जून २०२० रोजी अभिनेता सुशांत सिंह राजपूतने त्याचं जीवन संपवलं होतं. आता सीबीआयनं एफआयआर दाखल केल्याने याप्रकरणाला नवं वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आदित्य ठाकरेंसह अनेक नावांचा समावेश

सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणी सीबीआयनं मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार नव्याने गुन्हा दाखल केला आहे. एफआयआरमध्ये दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांच्या जबाबाचा उल्लेख आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रकरण दडपण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, असा आरोप सतीश सालियन यांनी केला आहे. या जबाबात उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह, एन्काऊंटर स्पेशलिस्ट सचिन वाझे, अभिनेता सूरज पांचोली, दिनो मोरिया, रिया चक्रवर्ती यांच्या नावांचाही उल्लेख आहे.

फाइल्स आणि सरकारी नोंदी नष्ट करणे किंवा दडपणे, त्यात फेरफार करणे, आरोपींना वाचवण्यासाठी सरकारी यंत्रणांचा दुरुपयोग करणे, यासारख्या प्रकरणांची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी सतीश सालियन यांनी जबाबात केली आहे.

दिशाच्या वडिलांचा सीबीआयला जबाब काय?

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा देखील कटात हात

आरोपींना वाचवण्यासाठी पदाचा दुरूपयोग केल्याचा आरोप

आदित्य ठाकरे, रोहन रॉय, दिनो मोरिया, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, सचिन वाझे, परमबीर सिंह, अनिल देशमुख यांच्यावर आरोप

मुख्य गुन्ह्याचा कट रचणे, आत्महत्येची कहाणी तयार करणे, पुरावा नष्ट करणे असे आरोप.

या बड्या नावांसोबत दिशा सालियानच्या वडिलांनी मुंबई पोलिसातील काही अधिकाऱ्यांच्यावरही *(उर्वरित पान २ वर)*

देश निरंतर प्रगतीच्या पथावर पुढे जावो

गणेश चतुर्थीनिमित्त मोदींकडून देशवासियांना शुभेच्छा



नवी दिल्ली दि. १४ : गणेश चतुर्थी आज देशभर मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आणि भाविकांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट शेअर करत त्यांनी महागणपतीकडे देशाच्या प्रगतीसाठी आणि नागरिकांच्या आयुष्यात सुख-समृद्धी येण्यासाठी प्रार्थना केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वर पोस्ट करत लिहिले, देशवासीयांना गणेश चतुर्थीच्या अनंत शुभेच्छा. *(पान २ वर)*

मरेन पण मागं हटणार नाही; मनोज जरांगे पाटलांचा मुंबईत उपोषणाचा एल्गार

जालना दि. १४ : मरेन पण मी मागे हटणार नाही, डाग लावून घेणार नाही, खितपत पडून मरणार नाही. मी क्षत्रिय मराठा आहे, कोणापुढे गुडघे टेकून शरण जाणार नाही. माझ्या समाजाच्या लेकराबाळांच्या कल्याणासाठी वेळप्रसंगी मी मरेन, पण समाजाचा स्वाभिमान आणि प्रतिष्ठा इंचभरही कमी होऊ देणार नाही. ही कदाचित माझी शेवटची झुंज किंवा शेवटची भेट असू शकते, पण मराठ्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत ताठ मानेने आणि जातीनं लढले पाहिजे, असे भावनिक आवाहन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, उद्या १५ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता मी अंतरवाली सराटीवरून मुंबईच्या दिशेने ठरलेल्या मार्गाने निघणार आहे. माझ्यासोबत जास्तीत जास्त दोन गाड्या आणि दोन ॲम्ब्युलन्स असतील, ५ ते १० माणसांपेक्षा जास्त कोणी सोबत असणार नाही. त्यांनी सांगितले की, मराठा समाजाने सध्या मुंबईला येऊ नये. तुम्ही गावागावात ज्या गाड्या लावल्या आहेत आणि ज्या वर्गण्या केल्या आहेत, त्या तशाच ठेवा. त्यातील एक रुपयाही खर्च करू नका. उलट आता वेळ मिळाला आहे, तर ५ गाड्यांच्या जागी ७ आणि १० गाड्यांच्या जागी १२ कशा करता येतील याचा प्रयत्न करून ताकद *(उर्वरित पान २ वर)*

गणरायाच्या आगमनाने महाराष्ट्र भक्तिमय; नेत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव

मुंबई दि. १४ : विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाने संपूर्ण महाराष्ट्र भक्तिमय झाला असून राज्यभर गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण असून आपल्या लाडक्या बाप्पाची मूर्ती घरी किंवा सार्वजनिक मंडळाच्या ठिकाणी आणण्यासाठी सकाळपासूनच लगबग सुरू आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये आणि गावांमध्ये गणेशोत्सवाच्या तयारीला वेग आला असून ढोल-ताशांचा गजर, सजावट आणि भक्तिमय वातावरणाने सर्वत्र चैतन्य निर्माण झाले आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्रातील *(उर्वरित पान २ वर)*

माहोल....

हे डीजे, खूप त्रास होत आहे सर्वांना... आता तुझा शेवट जवळ आला आहे, तुझा खात्मा करूनच मी जाईल आता!

ऐन गणेशोत्सवात पेट्रोल-डिझेल भडकणार

नवी दिल्ली दि. १४ : जागतिक बाजारात कच्च्या तेलाचा भडका उडाला असून अर्थव्यवस्थेवर याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सौदी अरेबियाच्या पूर्व-पश्चिम तेल पाइपलाइनवर हुती बंडखोरांनी हल्ला केला. या हल्ल्यानंतर ही पाइपलाइन बंद करण्यात आली आहे. यामुळे जगातील चार टक्के तेल पुरवठा धोक्यात आला आहे. या संघर्षाच्या घडामोडीनंतर सोमवारी ब्रेंट क्रूडचा भाव २.९० डॉलरने (२.७७%) वाढून १०७.५१ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचला. तर अमेरिकन डब्लूटीआय क्रूड २.२७ डॉलरने (२.२७%) वाढून १०२.३२ डॉलर प्रति बॅरल झाले. बाजार उघडताच दोन्ही कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये ३ टक्क्यांहून अधिक उसळी पाहायला मिळाली.

आखाती देश आणि इराण यांच्यात सोमवारी 'स्ट्रेट ऑफ होर्मुज'बाबत होणारी महत्त्वाची बैठक तहकुब करण्यात आल्याची माहिती ओमानने दिली आहे. दुसरीकडे, हूती बंडखोर हे पेरिम बेटापर्यंत पोहोचल्याने 'बाब-अल-मंदेब' या अत्यंत *(उर्वरित पान २ वर)*

जागतिक पातळीवर पंतप्रधान मोदी हिंदी बोलतात तेव्हा छाती फुगते; फडणवीसांनी सांगितला भाषेचा अभिमान

मुंबई दि. १४ : जागतिक पातळीवर पंतप्रधान मोदी जातात, हिंदी बोलतात तेव्हा छाती फुगते, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषेप्रती पंतप्रधान नरेंद्र मोदींना असलेला अभिमान सांगितला. गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत आज हिंदी दिवस आणि ६ व्या अखिल भारतीय भाषा परिषदेचं आयोजन महाराष्ट्रात, नवी मुंबईत करण्यात आलय. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषेच्या स्वाभिमानावर भाष्य केले. देशभरात आज हिंदी दिवस साजरा होत आहे. त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत कार्यक्रम होत आहे.

कार्यक्रमात उशिरा आल्याने सर्वांची क्षमा मागतो, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. या संमेलनासाठी महाराष्ट्र निवडला गेला, हे संमेलन कधीकाळी औपचारिकता म्हणून केलं जायचं पण अमित शहांनी निर्णय घेतला आणि हे संमेलन कालांतराने राज्यात व्हावं हे निश्चित झाले. इंग्रजकाळात कामकाज हिंदीत व्हायचं, अनेकांनी हिंदीचा स्वीकार केला. १९६३ मध्ये हिंदी आणि इंग्रजीला पुन्हा एकदा राजभाषा म्हटलं गेलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हापासून पंतप्रधान झालेत तेव्हापासून देशात मातृभाषा आणि राजभाषेचा सन्मान झाला, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले. *(उर्वरित पान २ वर)*

महाराष्ट्र वीर सावरकरांची भूमी : अमित शाह

मुंबई दि. १४ : मी गुजरातचा आहे, तिथं हिंदी बोलली जात नाही; गुजराती बोलली जाते. तथापि, जेव्हा माझ्या पक्षाने माझ्यावर राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची जबाबदारी सोपवली, तेव्हा मला देशभरात काम करताना कोणतीही अडचण आली नाही, कारण मला हिंदी समजत होती आणि बोलताही येत होती. राजभाषेने मला देशभरात काम करण्याची एक मोठी संधी दिली. महाराष्ट्र ही वीर सावरकरांची भूमी आहे. आपण सर्व सावरकरांना एक महान स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक म्हणून ओळखतो. तथापि, सावरकर हे त्यांच्या *(उर्वरित पान २ वर)*

Amit R. Bijwe
Mob.: 9422917360
FISH O FISH®
AQUARIUM
Up to 20% Discount
• Pedigree
• Royal Canin
• N&D
• Whiskas
• SmartHeart
• Me-O
Dog Food & Accessories
Birds Cages
•Fishes
•Fancy Imported Tank
•Aquarium Accessories
Ganesh colony, Shilangan Road, (Ravi Nagar Road) Amt. ☎ : 2562939

PERSONALISE SOFA WITH YOUR STYLE
01 CHOOSE YOUR SIZE
02 PICK YOUR SIZE
03 SELECT YOUR FABRIC & COLOURS
04 YOUR UNIQUE SOFA IS READY
Customise Your Sofa Today
POONAM FURNITURE
CHAITANYA COLONY, OLD BYPASS ROAD, AMRAVATI

ममता बॅनर्जींचे १७ बंडखोर खासदार भाजपमध्ये जाणार

नवी दिल्ली दि. १४ : राजधानी दिल्लीत सर्वात मोठ्या राजकीय घडामोडी घडताना दिसत आहेत. ममता बॅनर्जी यांच्या पक्षातून बंडखोरी करून नॅशनलिस्ट सिटिजन पार्टी ऑफ इंडियामध्ये सामील झालेल्या १७ खासदारांबाबतची मोठी अपडेट समोर आली आहे. एनसीपीआयचे खासदार जगदीश चंद्र बर्मा बसुनिया यांनी या खासदारांबाबत मोठं विधान केलं आहे. दुर्गा पूजेच्या आधीच हे सर्व खासदार एनसीपीआयमधून भाजपमध्ये सामील होणार आहेत, असं बसुनिया यांनी म्हटलं आहे. मात्र, भाजपमध्ये सामील होणाऱ्या खासदारांमध्ये तीन अल्पसंख्याक खासदारांचा समावेश नाही.

एका वृत्त वाहिनीशी बोलताना जगदीश चंद्र बर्मा बसुनिया यांनी हा दावा केला आहे. खासदार अबू ताहिर आणि खलीलूर रहमान यांना वेगवेगळी खाती दिली जाणार आहेत. ते एनडीएला पाठिंबा देतील. त्यांच्या मतदारसंघात सर्वाधिक अल्पसंख्याक क्षेत्र आहेत. त्यामुळे ते थेट भाजपमध्ये जाणार नाहीत. त्याने आम्हाला काही अडचण होणार नाही, असं बसुनिया यांनी म्हटलं आहे.

भाजपनेच आम्हाला एनसीपीआयमध्ये आणलं होतं. पण आम्हाला भाजपमध्ये जायचं होतं. आता सर्व काही गोष्टी व्यवस्थित झाल्या तर आम्ही २० ते १७ खासदार दुर्गा पूजेच्या आधीच भाजपमध्ये प्रवेश करू, असंही त्यांनी स्पष्ट केलं. बसुनिया हे सुद्धा टीएमसीमधून एनसीपीआयमध्ये आले आहेत.

टीएमसी कार्यालयाची जाळपोळ

जगदीश चंद्र बर्मा बसुनिया हे कूचबिहार येथील खासदार आहेत. रविवारी *(उर्वरित पान २ वर)*

■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम